ग्रंथालय संचालनालय
म. राज्य, मुंबई
आवक क्रमांक ५३४
दिनांक ११।१२।१४
कार्या ३

**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या पडताळणी अहवालावर मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
**शासन निर्णय क्र. मराग्रं -२०१२/प्र.क्र.२५३/(भाग-२)/साशि-५,**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
**दिनांक : ०५ डिसेंबर, २०१४.**

**वाचा :** १) शासन निर्णय क्र. मराग्रं-२००९/प्र.क्र.२३६/साशि-५, दिनांक २१ फेब्रुवारी २०१२
२) शासन निर्णय क्र. मराग्रं-२०१२/प्र.क्र.२५६/साशि-५, दिनांक २२ मार्च, २०१३
३) शासन निर्णय क्र. मराग्रं-२०१२/प्र.क्र.२५३/२०१३/साशि-५, दिनांक ०७ जून, २०१४
४) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३२/त.अ/२०१४-१५/५७४७, दिनांक ०९ जून,२०१४.
५) शासनाचे पत्र क्र. मराग्रं-२०१२/प्र.क्र.२५३/(भाग-२)/साशि-५, दिनांक २५, जुलै,२०१४.
६) सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांचे पत्र क्र. सग्रंसं/औरंगाबाद/२०१४-१५/ १४९४, दिनांक १०.११.२०१४.

**प्रस्तावना :** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ अंतर्गत तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम,१९७० मधील तरतुदीनुसार, सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येते.

दिनांक २८.१२.२०११ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुज्ञेय असलेल्या परिरक्षण अनुदानात, दिनांक ०१.०४.२०१२ पासून विद्यमान दराच्या ५०% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणारी अनुदान वाढ ही सर्वकष पडताळणी/तपासणी झाल्यानंतरच अनुज्ञेय राहील, असे संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, मा. मुख्य सचिव यांच्या आदेशान्वये, राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची पडताळणी, महसूल यंत्रणेकडून, दिनांक २१ मे,२०१२ ते २५ मे,२०१२ या कालावधीत करण्यात आली होती. सदर पडताळणी अहवाल दिनांक ०६.०३.२०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत सर्व अटी व शर्तींची पुर्तता करीत असलेल्या व पडताळणीअंती किमान अपेक्षेने कार्यरत असलेल्या ५७८४ ग्रंथालयांना वर्ष २०१२-१३ पासून नियमित अनुदानासह ५०% वाढीव अनुदान मंजूर करण्यात आले व त्रुटी आढळून आलेल्या ५७८८ ग्रंथालयांची फेर तपासणी करुन प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असा मा. मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आला आहे.

मा. मंत्रिमंडळाने दिनांक ०६.०३.२०१३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार महसुल विभागाच्या पडताळणी अहवालात त्रुटी आढळून आलेली ५७८८ ग्रंथालये, तद्नंतर महसूल विभागाने पडताळणी केलेली ४ ग्रंथालये व ग्रंथालय संचालक यांनी तपासणी केलेली ११ ग्रंथालये, अशा एकूण ५८०३ ग्रंथालयांची फेर तपासणी केली असता, त्यामध्ये ५७०१ सार्वजनिक ग्रंथालयांनी त्रुटींची पूर्तता केली असल्याचे दिसून आले. ८३ ग्रंथालयांनी त्रुटींची पूर्तता केली नसल्याने, त्यांची विहित पद्धतीने मान्यता रद्द करण्यात आली आहे व १९ ग्रंथालयांना दर्जावनत करण्यात आले आहे. याबाबतचा अहवाल दिनांक ०२.०६.२०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर केला असता, मंत्रिमंडळाने फेर तपासणीमध्ये कार्यरत आढळलेल्या ५७०१ ग्रंथालयांना नियमानुसार देय असलेली ५०% वाढ लागू करावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार याबाबतचा शासन निर्णय संदर्भ क्रमांक ३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्र. ग्रंथालय संचालक यांनी संदर्भ क्रमांक ४ येथील पत्रान्वये ५७०१ ग्रंथालयांना केव्हापासून वाढीव अनुदान द्यावे, याबाबत मार्गदर्शन मागविले होते. त्यानुषंगाने त्रुटीमध्ये असलेल्या ग्रंथालयांपैकी त्रुटींची पुर्तता केल्याचे फेर तपासणीत आढळून आलेल्या ५७०१ ग्रंथालयांना ५०% वाढीव अनुदान देण्याबाबतचा निर्णय, दिनांक ०२.०६.२०१४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असल्याने, त्यांना दिनांक २.६.२०१४ पासून ५०% अनुदान वाढ लागू करावी, असे शासनस्तरावरुन प्र. ग्रंथालय संचालक यांना दिनांक २५.०७.२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद यांनी सरकारी वकीलामार्फत, कार्यरत सार्वजनिक ग्रंथालयांना ५०% वाढीव अनुदान मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयापासून देण्यात येते, ही बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणली नसल्यामुळे, मा.

उच्च न्यायालय यांनी दिनांक ०३.११.२०१४ च्या आदेशामध्ये शासनाचे कक्ष अधिकारी यांनी वरिष्ठस्तरावर किंवा राज्य शासनाची परवानगी न घेता दिनांक २५.०७.२०१४ चे पत्र निर्गमित केले आहे, असे नमूद करुन शासनाचे सदरचे पत्र रद्दबातल ठरविले आहे आणि राज्य शासनाने या प्रकरणी योग्य तो निर्णय ४ महिन्यात घ्यावा, असे आदेश दिले आहेत. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे-

**शासन निर्णय :** महसूल विभागाच्या पडताळणी अहवालात त्रुटी आढळून आलेली ५७८८ ग्रंथालये, तद्नंतर महसूल विभागाने पडताळणी केलेली ४ ग्रंथालये व ग्रंथालय संचालक यांनी तपासणी केलेली ११ ग्रंथालये अशा एकूण ५८०३ ग्रंथालयांची, ग्रंथालय संचालनालयामार्फत फेर तपासणी केली असता, त्यामध्ये कार्यरत आढळलेल्या ५७०१ ग्रंथालयांना ५०% वाढीव अनुदान देण्याचा निर्णय, दिनांक ०२.०६.२०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असल्याने, या ग्रंथालयांना दिनांक ०२.०६.२०१४ पासून वाढीव अनुदान लागू करण्यात यावे.

२. हे आदेश मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक ८२२६/२०१४ प्रकरणी, दिनांक ०३.११.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक **२०१४१२०५१६१०२४६३०८** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( शैला तारगे-पाटील )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ) मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, }
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, } (ग्रंथालय संचालनालयामार्फत)
सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक/ }
ग्रंथपाल, सर्व शासकीय विभागीय ग्रंथालये/ }
ग्रंथपाल, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालये, }
अध्यक्ष, सर्व राज्य, विभाग व जिल्हा ग्रंथालय संघ, }
मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, मुंबई
सर्व जिल्हा कोषाधिकारी / उप कोषागार, नवी मुंबई
वित्त विभाग (व्यय-५) (अर्थसंकल्प-३)/ नियोजन विभाग (१४२३/१४७१)